15 MAY 2021 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्येष्ठांनी मानसिक स्वास्थ्यही जपावे

## ज्येष्ठ नागरिक अभ्यासक प्रकाश बोरगावकर यांचे आवाहन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ज्येष्ठ नागरिकांनी कोरोना काळात आपल्या शारीरिक स्वास्थ्याबरोबर मानसिक स्वास्थ्यही जपावे. याकरिता घरातून बाहेर पडू नका; पण मनाची कवाडे चालू ठेवा, असे आवाहन ज्येष्ठ नागरिक अभ्यासक प्रकाश बोरगावकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभागाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफताना ते बोलत होते. ते म्हणाले, देशात ११.५ कोटी ज्येष्ठ नागरिक आहेत. २०५० पर्यंत ही संख्या ३७.५ कोटी पर्यंत जाण्याची शक्यता आहे. आज ९० टक्के ज्येष्ठ नागरिकांना पेन्शन नाही. त्यांना आर्थिक उत्पन्नाचे स्रोत नाहीत. अशावेळी तरुणांनी अधिक सजग असणे गरजेचे आहे. सुमारे ४० टक्के ज्येष्ठ नागरिक एकाकी राहतात. यासाठी तरुणांनी पुढाकार घेऊन त्यांचे एकाकीपण दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत. ज्यांना पेन्शन आहे त्यांनी स्वतःचे आर्थिक नियोजन करायला हवे. ज्येष्ठांच्या आर्थिक किंवा शारीरिक समस्या आहेत, त्याकडे तरुणांनी लक्ष दिले तर त्यांचे जीवन आनंदाने व्यतित होऊ शकते, असेही त्यांनी सांगितले.

आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभागाचे प्र. संचालक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी महेश चव्हाण उपस्थित होते. अतुल एतावडेकर यांनी आभार मानले.

तरूण भारत

# विद्यापीठातील दूरशिक्षणचे स्टडी मटेरियल ई-मेलवर

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण विभागांतर्गत दरवर्षी शेकडो विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तरचे शिक्षण दिले जाते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दूरशिक्षणचे स्टडी मटेरियल उपलब्ध करून दिले आहे. विद्यार्थ्यांच्या ई-मेल, व्हॉटसॲप ग्रुपवर ऑडिओ, व्हिडिओ तसेच पुस्तक स्वरूपात स्टडी मटेरियल पाठवले जाते. परंतु ज्या विद्यार्थ्यांनी चुकीचा फोन नंबर, चुकीचा ई-मेल आयडी दिला आहे त्यांना स्टडी मटेरियल पोहोचलेले नाही.

दूरशिक्षण विभागातील विद्यार्थ्यांमध्ये ग्रामीण भागातील महिला किंवा कामावर जाणरे कर्मचारी यांची संख्या जास्त असते. त्यामुळे आपण ज्या स्टडी सेंटरवर प्रवेश घेतला आहे, त्या स्टडी सेंटरवर पूर्वीप्रमाणे पुस्तक स्वरूपात स्टडी मटेरियल मिळावे, अशी विद्यार्थ्यांची अपेक्षा असते. परंतु यंदा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ बंद असल्याने विद्यार्थ्यांना पारंपरिक पद्धतीने स्टडी मटेरियल मिळू शकलेले नाही. गतवर्षीपासून लॉकडाऊन असल्याने स्टडी मटेरियल ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न विद्यापीठ करीत आहे. लॉकडाऊन शिथिल झाल्यानंतर काही विद्यार्थी व स्टडी सेंटरनी विद्यार्थ्यांचे स्टडी मटेरियल पोहोच केले, परंतु २०० विद्यार्थ्यांनी चुकीचा फोन नंबर आणि ईमेल आयडी दिल्याने त्यांच्याशी संपर्क झाला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रवेशअर्ज अचूकपणे भरण्याची गरज आहे. विद्यापीठानेही मटेरियलसंदर्भात प्रचार आणि प्रसार करण्याची गरज आहे.

**विद्यापीठाशी संपर्क साधावा**

ज्या विद्यार्थ्यांना स्टडी मटेरियल मिळाले नसेल त्यांनी विद्यापीठातील दूरशिक्षण विभागाशी संपर्क साधावा. विद्यार्थ्यांना ईमेल आयडी किंवा व्हॉटसॲप ग्रुपवर स्टडी मटेरियल उपलब्ध करून देता येईल.

**डॉ. एन. जे. बनसोडे (उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण विभाग)**